RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग दोन

वर्ष १२, अंक ३०] सोमवार, एप्रिल २७, २०२६/वैशाख ७, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये १२.००

असाधारण क्रमांक ५१

प्राधिकृत प्रकाशन

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

क्रमांक कडोंमपा/साप्र/कार्या-९.—नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक कडोंम-१०२२/ सं.क्र.१३४(ई-८३५८४२)/नवि-२८, दि.२९/०९/२०२५ अन्वये कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२१ मधील अ.क्र.१६ सहायक अभियंता (स्थापत्य), अ.क्र.२० सहायक अभियंता (यांत्रिकी), अ.क्र. २४ सहायक अभियंता (विद्युत) या ३ पदांच्या नेमणुकीच्या अर्हता व नेमणुकीच्या पद्धतीमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५४, ४५५ व ४५७ (३) नुसार परिशिष्ट-१ अनुसूची- "अ" प्रमाणे सुधारणा करण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार या नियमांस "कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सुधारित सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२१ चा सुधारित भाग" असे संबोधण्यात येईल व सदर सुधारित नियम **शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील. त्याअनुषंगाने **महाराष्ट्र शासन राजपत्रात** खालील नियम प्रसिद्ध करण्यात येत आहेतः-

कल्याण डोंबिवली महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२१ चा सुधारित भाग

परिशिष्ट-१, अनुसूची-"अ"

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५४, ४५५ व ४५७ (३) अन्वये विहित शैक्षणिक व इतर अर्हता व नेमणुकीची पद्धत.

(पहा नियम-३)

अ.क्र.	पदनाम व श्रेणी	टक्केवारी	कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम. २०२१ मधील तरतूद	पदनाम, नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दतीत व टक्केवारीमधील सुधारीत तरतूद
१	२	३	४	५
१६	सहाय्यक अभियंता (स्थापत्य) (अभियांत्रिकी सेवा)	पदोन्नती १००%	कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर किमान ३ वर्षाची सेवा पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.	कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर किमान ३ वर्षाची सेवा पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल किंवा कार्यरत कर्मचारी निहाय व्यपगत पर्यवेक्षक या पदावर किमान १० वर्षाची सेवा पुर्ण झालेल्या व स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी/समकक्ष अर्हता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.
२०	सहाय्यक अभियंता (यांत्रिकी) (अभियांत्रिकी सेवा)	पदोन्नती १००%	कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) या पदावर किमान ३ वर्षाची सेवा पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.	कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) या पदावर किमान ३ वर्षाची सेवा पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल किंवा कार्यरत कर्मचारी निहाय व्यपगत पर्यवेक्षक या पदावर किमान १० वर्षाची सेवा पुर्ण झालेल्या व यांत्रिकी अभियांत्रिकी शाखेची पदवी/ समकक्ष अर्हता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.
२४	सहाय्यक अभियंता (विद्युत) (अभियांत्रिकी सेवा)	पदोन्नती १००%	कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (विद्युत) या पदावर किमान ३ वर्षाची सेवा पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.	कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (विद्युत) या पदावर किमान ३ वर्षाची सेवा पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल किंवा कार्यरत कर्मचारी निहाय व्यपगत पर्यवेक्षक या पदावर किमान १० वर्षाची सेवा पुर्ण झालेल्या व विद्युत अभियांत्रिकी शाखेची पदवी/ समकक्ष अर्हता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.

अभिनव गोयल, भा.प्र.से.

आयुक्त,

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका,

कल्याण.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.